



# दैनिक वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

VADAL VARTA






vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● रविवार १४ एप्रिल २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २४१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये





















## 'मी प्रथम भारतीय आणि अंतिमत: भारतीय'

संविधानाच्या माध्यमातून भारतासारख्या सर्वधर्मीय देशाला एका माळेत ओवण्याचे अद्वितीय कार्य घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. समाजाच्या हितापेक्षा त्यांनी राष्ट्रहिताला सर्वोच्च मानले. त्यांची राष्ट्रभक्ती ही भावनेच्या प्रवाहात वाहून जाणारी नव्हती तर सत्याच्या कसोटीवर योग्य ठरणारी होती. 'मी प्रथम भारतीय आणि अंतिमत: भारतीय' असा घटनाकारांचा उद्घोष होता. आशा विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन.











संपादकीय

## चैत्र आणि आश्विनमध्ये भरते देवीची यात्रा!

महाराष्ट्रात देवींची साडेतीन शक्तिपीठे मानली जातात. त्यापैकी पार्वती, यमाई, रेणुका मातेचा अवतार म्हणजे एकवीरा देवी! लोणावळ्याजवळील वेहेरगाव-कार्ला गडावरील आई एकवीरा देवी ही एक आदिशक्ती असून, एक जागृत देवस्थान म्हणून तिची ख्याती आहे. महाराष्ट्रातील प्रसिद्ध देवस्थानांमध्ये कार्ला येथील एकवीरा देवस्थानचा समावेश आहे. इसवी सनाच्या पहिल्या शतकातील शिल्पकला आणि लेणी कलेचा उत्तम नमुना म्हणजे लोणावळ्याजवळील वेहेरगाव येथील कार्ला लेणी! या लेण्यांत ऐश्वर्य असले, तरी डामडौल नाही. पुणे-मुंबई या दोन महानगरांच्या मध्यभागी विपुल निसर्गसंपदा, प्राचीन व ऐतिहासिक लेण्या व गड-किल्ले, भरपूर जलसाठा अशा विविधतेने नटलेल्या मावळ तालुक्याच्या वैभवात भर टाकणारी कार्ला लेणी व श्री एकवीरा मातेचे मंदिर आहे. सदर श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा संकलित लेख पूर्ण वाचा... संपादक. सदर बौद्धकालीन प्राचीन लेणी असून १६० ख्रिस्तपूर्व सनापासून अस्तित्वात आहेत. देवीची मूर्ती स्वयंभू पाषाणाची आहे. सन १८६६ला या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आल्याचे समजते. या परिसरातील देवीला वेहेरगावची यमाई, अंबामाता किंवा परशुराममाता रेणुका असे म्हटले जाते. महाराष्ट्रातील विशेषत: मुंबई, ठाणे, रायगड, कोकण भागातील कोळी, आगरी, माळी, कुणबी, सोनार, पाठारे, चांद्रसेनीय कायस्थ, ब्राह्मण, प्रभू, चौकळशी, पाचकळशी अशा अनेक समाजांची श्री एकवीरा देवी कुलस्वामिनी असून श्रद्धास्थानही आहे. नवसाला पावणारी देवी म्हणून एकवीरा आईची ख्याती आहे. चैत्र आणि आश्विन या दोन महिन्यांत देवीची यात्रा भरते. या दोन्ही यात्रांना कोकणातील कोळी बांधवांसह राज्यातील लाखो भाविक देवीच्या दर्शनास व नवस फेडण्यासाठी येतात. नवरात्रोत्सव हा स्त्रीशक्तीच्या पूजनाचा आणि स्तवनाचा असतो. यात्राकाळात राज्याच्या विविध भागांतून कोळी बांधवांसह इतर भाविक देवीच्या दर्शनासाठी व नवस फेडण्यासाठी येतात. या देवस्थानची व्यवस्था श्री एकवीरा देवस्थान ट्रस्ट पाहते. मागील काही वर्षांपासून शिवसेनेचे माजी आमदार अनंत तरे या देवस्थानचे अध्यक्ष होते. त्यांच्या पुढाकाराने या दुर्लक्षित पर्यटन व धार्मिक स्थळाच्या विकासाला गती प्राप्त झाली आहे. गडावर विजेची सेवा, भाविकांच्या निवासासाठी धर्मशाळा, मुबलक पाणी, परिसराचे सुशोभीकरण, पायथा ते गडापर्यंत पायऱ्यांना संरक्षक लोखंडी रेलिंगची व्यवस्था अशा विविध सुविधा उपलब्ध झाल्या असून प्रस्थानद्वाराच्या जागी नव्याने सागवान लाकडाचे सुंदर नक्षीदार प्रवेश व प्रस्थानद्वार बसविण्यात आले आहे."एकवीरा आई तू डोंगरावरी| नजर हाय तुझी कोल्यावरी||" खरोखरच हे अर्थपूर्ण गाणे एकेदिवशी ऐकायला मिळाले. यापूर्वीही अनेकदा हे गाणे ऐकले होते. पण, आजचा दिवस जरा वेगळा होता. कारण, आज 'एकवीरा आई तू डोंगरावरी' या गाण्यात वर्णन केलेल्या एकवीरा आईचे मंदिर असलेल्या कार्ला, बेहेरगाव, मळवली, लोणावळा परिसरात कामानिमित्त निघाला आहात. वेळ मिळाल्यास प्रत्यक्ष देवीच्या दर्शनालाही जायचे असा बेत मनोमन केला असेल नाही का? तेव्हा तुमच्या गाडीने पिंपरी-चिंचवडमधील निगडी सोडले असेल. लोणावळ्याच्या दिशेने गाडी निघाली सुद्धा. त्यावेळी चालकाने "एकवीरा आई तू डोंगरावरी..." हे गाणे लावलेले असेल आणि साहजिकच तुमच्यात चर्चा सुरू झाली असेल, एकवीरा देवीबाबत. कदाचित त्यांच्याही मनात देवीच्या दर्शनाला जायचा बेत असावा. समजा एक सहकारी म्हणतो, "चाललोच आहोत, तर एकवीरा देवीचे दर्शन घेऊ या." पण, काही सहकाऱ्यांनी नको म्हणत "आधी काम करू. ते लवकर संपले तर देवीच्या दर्शनाला जाऊ." असे सुचवेल. त्यावर सर्वांचे एकमत होईल. पण, चर्चेत एकवीरा देवी, तिचे स्थान असलेले कार्ला-बेहेरगाव डोंगर, परिसरातील लेण्या, एकवीरा देवीची महती सर्वच विषय आलेत. त्यामुळे देवीविषयी बरीच माहिती मिळेल, त्यानुसार नाही कहो?

एकवीरा देवीला एकवीरा आई असेही म्हणतात. तेच शब्द मोटार चालकाने लावलेल्या गाण्यात होते. पुणे-मुंबई महामार्गावरील लोणावळा शहरापासून जवळच कार्ला लेणी आहे. पुण्याहून जाताना लोणावळ्याच्या अगोदर कार्ला फाटा लागतो. तेथून साधारण तीन किलोमीटर अंतरावर एकवीरा देवीचे मंदिर आहे. लोकल रेल्वेने पुणे, पिंपरी-चिंचवडमधून गेल्यास मळवली रेल्वे स्थानकावर उतरून वाहनाने देवीच्या दर्शनाला जाता येते. हे साधारण पाच ते सहा किलोमीटर आहे. एकवीरा देवीच्या दर्शनासाठी कोकणातील बांधव दरवर्षी जातात. शिवाय, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह ठाकरे कुटुंबीयसुद्धा देवीच्या दर्शनासाठी व पूजेसाठी येतात. देवीचे मंदिर डोंगरात असून परिसरात लेणी आहे. तिला कार्ला लेणी असे म्हटले जाते. शारदीय व शाकंभरी नवरात्रामध्ये देवीच्या दर्शनासाठी भाविकांची खूप गर्दी असते. एकवीरा देवीबाबत काही आख्यायिका अनेकांकडून ऐकायला मिळाल्या आहेत. त्यातील एक आख्यायिका महाभारताशी संबंधित आहे-

त्यानुसार पंडुराजाला पाच पुत्र होते. धर्मराज, भीम, अर्जुन, नकूल, सहदेव अशी त्यांची नावे. त्यांना पाच पांडव नावाने ओळखले जाते. ते वनवासाला निघाले होते. वनात भटकत असताना कार्ला परिसरात पोहोचले. त्यांच्या समोर प्रत्यक्ष देवी प्रकट झाली. 'या ठिकाणी माझे मंदिर बांधा' असा दृष्टांत दिला. पण, 'एका रात्रीतच मंदिर बांधायला हवे' अशी अटही घातली होती. तिचा स्वीकार करत पांडवांनी एका रात्रीत मंदिर बांधले. देवी प्रसन्न झाली. वनवासानंतर पांडवांना एक वर्ष अज्ञातवासात राहायचे होते. या काळात 'पांडवांना कोणीही ओळखू शकणार नाही

# डॉ.बी. आर.आंबेडकर - शेतक-यांचे कैवारी

भारताच्या इतिहासाची सुवर्ण पाने उलगडताना स्वयं प्रकाशीत झालेले सोनेरी अक्षरांनी लिहिले गेलेले सूर्यतेजाने तेजस्वी झालेले एक नांव डोळ्यासमोर येऊन उभे राहते. ते म्हणजे क्रांतिसूर्य, बोधिसत्व,विश्वरत्न, भारताचे आधुनिक शिल्पकार परमपूज्य डॉ. भिमराव रामजी आंबेडकर. एक माणूस किती अफाट कार्य करू शकतो याची प्रचिती डॉ.बाबासाहेबांकडे पाहून येते. अत्यंत खडतर परिस्थितीत त्यांनी जे करून दाखवले ते कधीही, कुणालाही करणे शक्य नाही. न भूतो न भविष्य असे कार्य त्यांनी केले आहे. त्यांच्या कार्याची दखल जगाच्या इतिहासाने घेतली आहे.

अशा या महामानवाचा जन्म 14 एप्रिल 1891 साली मध्यप्रदेशातील महू या गावी झाला. असीम बुद्धिमत्ता, समाजासाठी प्रचंड त्याग करण्याची वृत्ती ,वंचितांना न्याय हक्क मिळवून देणारे, महाडचा सत्याग्रह,मनुस्मृतीचे दहन,काळाराम मंदिर प्रवेश, शेतकऱ्यांचे कैवारी,पुणे करार,गोलमेज परिषद, बहिष्कृत भारत,दलित शिक्षण संस्थेची स्थापना, पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना, महिलांचे




हक्क व अधिकार,स्वातंत्र्य लढ्यात सहभाग, भारताची राज्यघटना असे अनेक महान कार्य डॉ. बाबासाहेबांनी आपल्या जीवनामध्ये केले. दीनदुबळ्या समाजासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. बाबासाहेबांनी शूद्र,स्त्रिया, वंचितांसाठी, भारतातील प्रत्येकासाठी कार्य केलेच परंतु शेतकऱ्यांसाठी त्यांनी अनन्य साधारण असे कार्य केले.

शेतीला उद्योग, व्यवसाय मानून शासनाने पायाभूत सुविधा पुरवून शेतकऱ्यांचा विकास केला पाहिजे. शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीमध्ये बदल झाला पाहिजे,म्हणजे खेड्यातील माणसांच्या मानसिकतेमध्ये सकारात्मक बदल घडेल. आर्थिक विषमता जितकी कमी होईल तितकीच जातीय भेदभावाची दरी कमी होईल असे डॉ. आंबेडकरांना नेहमी वाटायचे. त्यांनी सर्वात महत्त्वाची संकल्पना मांडली ती म्हणजे शेतीचे राष्ट्रीयकरण करणे. पिक घेण्याची पद्धत,, पाणी उपलब्धता बांध बांधणी,उत्पादनाची वाढ,साठवण व्यवस्था, शेतीतील मालाची विक्री,शेतमालाचा भाव,यांचे नियम करावे असे त्यांचे स्पष्ट मत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या काही संकल्पनेतूनच कमाल जमीन धारण कायदा,सावकारी व खोत प्रतिबंध कायदा , राज्यातील नद्या जोड प्रकल्प व विकास,जलसंवर्धन अशा अनेक योजना अमलात आल्या. याबाबतीत विविध कायदे करण्यात आले त्यामागे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा मोठा प्रभाव दिसून येतो.

अशा या शेतकऱ्याच्या कैवाऱ्याला आज जयंतीदिनी कोटी कोटी विनम्र अभिवादन करूया.. डॉ. बाबासाहेबांच्या प्रेरणादायी विचारांना जीवनामध्ये सदैव स्मरूया... भारताच्या भाग्य विधात्याला विनम्र अभिवादन.

तुझ्या जन्मा आधी क्रांतीसुर्या
होता अज्ञानात भारत निजला
सूर्य उगवला महूच्या मातीमध्ये
सारा आसमंत हर्षाने भिजला

**शब्दांकन...**
**समाधान दिनकर लोणकर..**

## इतके महान शब्द नाहीत शब्दकोशात, अशी लेखणी पुण्यवान नाही जी महामानवाचे गुणगान गाईल.

अमाप संकटाना तोंड देत जो इतरांच्या सुखासाठी झटला, स्वातंत्र्याचा खराखुरा अर्थ ज्याने सार्थक करून दाखवला तो मूकनायक अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

१४ एप्रिल १८९१ रोजी बाबासाहेबांचा जन्म झाला. रामजी व भीमाबाई यांचे ते १४ वे अपत्य.

१८९४ मध्ये भीमरावांचे नाव सातारा येथील प्राथमिक शाळेत नोंदवले. नोव्हेंबर १९०४ मध्ये इंग्रजी ४ ची परीक्षा पास झाले.

जानेवारी १९०७ मध्ये मॅट्रिक पास होणारे अस्पृश्य समाजातील ते पहिले विद्यार्थी होते. त्यांचे अभिनंदन करण्यासाठी गुरुवर्य कृष्णाजी केळुसकर यांनी ' भगवान बुध्दाचे चरित्र ' हे पुस्तक भीमरावांना भेट दिले.

जानेवारी १९१३ मध्ये बी. ए पास झाले. १५ मे १९१५ रोजी भीमरावानी रोज अठरा तास अभ्यास करून अडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ ईस्ट इंडिया कंपनी या विषयावर प्रबंध लिहून कोलंबिया विद्यापीठाला एम. ए च्या पदवीसाठी सादर केला.२ जून १९१५ ला भीमरावांचा प्रबंध स्वीकारून एम. ए ची पदवी दिली.

३१ जानेवारी १९२० साली अस्पृश्य समाजातील प्रश्नांना वाचा फोडणारे मूकनायक हे वर्तमानपत्र सुरू केले. संविधानाचा शिल्पकार घडला तो रमाबाईंच्या पाठिंब्यामुळे. या माऊलीने त्यांच्यासाठी खूप त्याग केला, कष्ट सोसले. भीमरावांसारखं उत्तुंग व्यक्तिमत्त्व आपल्या महाराष्ट्रात जन्माला आल आणि भारताच नाव साऱ्या विश्वात गाजल, हे आपल भाग्यच म्हणावं लागेल. आज या महामानवाची जयंती त्यानिमित्त त्यांच्या विचारांना विनम्र अभिवादन.

**डॉ. बाबासाहेब नाव**
**अमर सदा राहिले,**
**त्यांच्या विचारांचे गीत**
**चहुदिशानी गुंजले...**

**त्यांच्या कर्तृत्वाचा वसा**
**मनामनात नांदावा,**
**असा क्रांतीसुर्य**
**घरोघरी जन्मावा...**

*************†***********

**जया विनायक घुगे - मुंडे**
**जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षिका,**
**खामगाव, परळी वैजनाथ, बीड**

## पाथरे येथे मारहाणीत तरुणाचा मृत्यू .

दैनिक वादळ वार्ता/नाशिक

जुन्या भांडणाची कुरापत काढून सिन्नर तालुक्यातील पाथरे येथे ४० वर्षीय तरुणास जमावाने मारहाण केली. या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या तरुणाचा उपचारासाठी दाखल करण्याच्या पूर्वीच मृत्यू झाल्याची घटना येथे घडली. याप्रकरणी वावी पोलीस ठाण्यात एकाच कुटुंबातील १३ जणांच्या विरोधात खुन व मारहानीची गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोमनाथ भाऊसाहेब आदमाने असे मृत झालेल्या तरुणाचे नाव आहे. तो आपल्या कुटुंबासमवेत पाथरे बुद्रुक शिवारात राहत होता शुक्रवारी रात्री साडे दहाच्या सुमारास आदमाने कुटुंब जेवण करून झोपण्याच्या तयारीत असतानाच गावातील राहटळ कुटुंबातील व्यक्तीने येऊन त्यांच्या घराचा दरवाजा तोडला व घरात घुसून राहटळ कुटुंबीयातील दहा ते पंधरा जणांनी आदमाने कुटुंबावर हल्ला केला, त्यात त्यांनी लाकडी दांडे, लोखंडी पाईप, लोखंडी गज यासारख्या प्राण घातक वस्तुंनी त्यांच्यावर हल्ला केल्यामुळे सोमनाथ आदमाने हे गंभीर रित्या जखमी झाले, त्यांना जखमी अवस्थेत कोपरगाव येथे खाजगी रुग्णालयात उपचारासाठी नेले मात्र तेथे पोहोचण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला, सून मनीषा व नात संस्कृती यांना देखील यावेळी मारहाण करण्यात आली असे मृताचे वडील भाऊसाहेब आदमाने यांनी सांगितले. राहणार पाथरे यांनी सुद्धा आदमाने परिवारावर हल्ला केल्याची तक्रार वावी पोलीस ठाण्यात केली असून त्यानुसार वरील सर्वांच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा

# नांदेड लोकसभेचे उमेदवार ॲड अविनाश भोसीकर यांच्या प्रचारार्थ वंचितचे बाळासाहेब आंबेडकर यांच्या सभेचे आयोजन.



**दैनिक वादळ वार्ता**
**हनुमंत/चंदनकर नायगाव**
नांदेड लोकसभा निवडणूक २०२४ वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अँड अविनाश भोसीकर यांच्या प्रचारार्थ वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांची नांदेड येथे जाहीर सभा दिनांक १९ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता नवा मोंढा मैदान येथे आयोजित करण्यात आली या सभेला लाखोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन वंचित बहुजन युवा आघाडी नांदेड दक्षिणचे जिल्हा उपाध्यक्ष दीपक माधवराव गजभारे घुमराळेकर यांनी केले आहे नांदेड लोकसभेमध्ये अनेक धन दांडगे उमेदवार रिंगणात उभे असताना वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अँड अविनाश भोसीकर यांना प्रचंड मताने निवडून देण्यासाठी श्रद्धे य बाळासाहेब




आंबेडकर यांची सभा आयोजित करण्यात आली आहे एकीकडे भाजपाचे उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर तर दुसरीकडे काँग्रेस महाविकास आघाडीचे वसंतराव चव्हाण यांनी रिंगणात उभे आहेत या दोन पक्ष्यांच्या उमेदवाराला हाणून पाडण्यासाठी व पुन्हा एकदा भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने व दिलेल्या घटनेच्या अधिकाराप्रमाणे आपण आपल्या मूल्यवान मताचा गैरवापर न करता येणाऱ्या लोकसभेमध्ये श्रद्धेय माननीय बाळासाहेब आंबेडकर यांचे हात बळकट करण्यासाठी व लोकशाही अबाधित ठेवण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार यांनाच सिटी या निशाणीवर बटन दाबून विजयी करा असा आव्हान दीपक गजभारे यांनी केले आहे तर या सभेला लाखोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान देखील दीपक गजभारे यांनी केलेले आहे.

## प्रेस फोटोग्राफर भीमाशंकर नावंदे यांनी जोपासली सामाजिक बांधिलकी शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देवून केला वाढदिवस साजरा



**वादळवार्ता/परळी वैजनाथ**
तालुक्यातील मौजे परचुंडी येथील सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करत असलेले सामाजिक कार्यकर्ते तथा प्रेस फोटोग्राफर भीमाशंकर नावंदे यांचा आज शनिवार दिनांक 13 एप्रिल रोजी वाढदिवस परचुंडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करून साजरा करण्यात आला वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून भीशंकर नावंदे यांनी समाज उपयोगी उपक्रम राबवत वाढदिवस साजरा केला. भीमाशंकर नावंदे हे राजकारण न करता नेहमीच समाजकारणामध्ये सक्रिय असल्याचे दिसून येते. परचुंडी व परिसरात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी भीमाशंकर नावंदे हे नेहमीच सक्रिय असतात. युवकांना सोबत घेऊन काम करणे हे भीशंकर नावंदे यांचा नेहमी उद्देश असतो. श्री नावंदे हे नेहमीच हसतमुख सर्वांसोबत प्रेमाने वागणारे व्यक्तिमत्व म्हणून परचुंडी व पंचक्रोशीमध्ये ओळखले जाते. वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा परचुंडी ता.परळी वैजनाथ येथे अनावश्यक खर्च टाळून खर्या अर्थाने समाज उपयोगी उपक्रम राबवला, यामध्ये शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि खाऊवाटप करून आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो ही मनोभावना मनात ठेवून खर्या अर्थाने भीमाशंकर नावंदे यांनी कार्य केले आहे. यावेळी जेष्ठ मंडळी सुभाष दादा रुपनर, व्यंकट पाटील गडदे, राम अण्णा सरांडे, कमलाकर नावंदे, अर्जुन सरांडे, बलभीम थोरात,बंडू सुरवसे, शंकर पत्रवाळे, दयानंद नावंदे, प्रेस फोटोग्राफर गणेश पत्रवाळे व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते . दरम्यान आज सकाळपासूनच भीमाशंकर नावंदे यांना दुरध्वनी व सोशल मिडीडीयाच्या माध्यमातून विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, डॉक्टर, इंजिनिअर, वकील यांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवात धारूर येथे वंचित चे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी केले रक्तदान




**वादळवार्ता/धारूर**
भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त धारूर येथे वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे पाटील यांनी रक्तदान देऊन रक्तदान शिबिरात सहभाग नोंदवला, रक्तदान सर्वश्रेष्ठदान प्रत्येकाने रक्तदान केले पाहिजे , कोणाच्यातरी कामाला येणार आहे. रक्तदान म्हणजे जीवदान यांच्या सोबत वंचितचे नेते प्रा.विष्णु जाधव, डॉ नितिन सोनवणे, शैलेश कांबळे ,मिलिंद घाडगे, धम्मानंद साळवे, बाबुराव मस्के,ज्ञानेश्वर कवठेकर अंकुश जाधव, बालाजी जगतकर,अजय सरवदे, राजेंद्र कोरडे,प्रशांत उजगरे,रानबा गायकवाड, पप्पू गायकवाड,किशोर भोले, धारुर तालुका पदाधिकारी, शहर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जयभीम: वांद्रे-वरळी सी लिंकवर झळकले बाबासाहेब: लेझर शोचा अनोखा देखावा; जयंतीची अमूल्य भेट

**वादळवार्ता/सोयगाव**
भारतीय संविधानाचे शिल्पकार आणि सामाजिक स्वातंत्र्याचे उद्गाते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची उद्या 14 एप्रिल रोजी जयंती आहे. बाबासाहेबांच्या जयंती निमित्ताने संपूर्ण देशभरात जल्लोष करण्यात येत असतो. देशातच नव्हे तर विदेशातही बाबासाहेबांना मानवंदना दिली जाते. वैचारिक कार्यक्रम ठेवून बाबासाहेबांना अनोखं अभिवादन केलं जातं. मुंबईतही बाबासाहेबांना यंदा अनोखं अभिवादन करण्यात आलं आहे. प्रसिद्ध वांद्रे-वरळी सी लिंकवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा झळकावण्यात आली आहे. लेझर शोच्या माध्यमातून ही प्रतिमा झळकवण्यात आली आहे. त्यामुळे हा अनोखा नजारा पाहून येणाऱ्या जाणाऱ्यांचे ऊर भरून येताना दिसत आहेत. उद्या 14 एप्रिल रोजी बाबासाहेबांची जयंती आहे. या निमित्ताने वांद्रे-वरळी सी लिंकवर आकर्षक विद्यूत रोषणाई करण्यात आली आहे. यावेळी सी लिंकवर लेझर शो करण्यात आला असून या लेझर शोमध्ये बाबासाहेबांच्या दोन प्रतिमा दिसत आहेत. त्याशिवाय तिरंगा झेंडा आणि अशोक चक्रही या लेझर शोमध्ये दिसत आहे.

अनोखा नजारा...विस्तीर्ण असा वांद्रे-वरळी



सी लिंक... त्यावर लावलेले दिवे... विद्यूत रोषणाई आणि लेझर शोमधून दिसणाऱ्या प्रतिमा... वर ढगांचं अच्छादन तर पुलाखाली अथांग पसरलेला काळाशार अरबी समुद्र...

या पार्श्वभूमीवर हा लेझर शो पाहून येणारे जाणारे हरखून जात आहेत. बाबासाहेबांची प्रतिमा दिसताच अपसूकच तोंडातून जयभीम असे उद्गार येत आहेत. लोकांची गर्दी

वांद्रे वरळी सी लिंकवरील लेझर शोमधून बाबासाहेबांची प्रतिमा पाहायला मिळत असल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली. त्यामुळे असंख्य लोकांनी सी लिंककडे धाव घेतली. महामानवाची प्रतिमा पाहण्यासाठी लोक येत होते. महापुरुषाची ही तस्वीर आपल्या मोबाईलमध्ये क्लिक करण्यासाठी प्रत्येकाची धडपड सुरू होती.

जयंती तरीही मेगा ब्लॉक

दरम्यान, उद्या आंबेडकर जयंती आहे. त्यानिमित्ताने हजारो लोक चैत्यभूमीला बाबासाहेबांना मानवंदना देण्यासाठी येत असतात. मात्र, उद्या रविवार असल्याने रेल्वेने नेहमीप्रमाणे मेगा ब्लॉक घेतला आहे. हा मेगा ब्लॉक रद्द करण्याची मागणी सर्वच स्तरातून होत आहे. खासदार राहुल शेवाळे यांनीही मेगा ब्लॉक रद्द करण्याची मागणी केली आहे.

## विकासनिधी वापस जाऊ देणा-यांना मते मागण्याचा अधिकार नाही - बजरंग सोनवणे

**बीड/पाटोदा**




मते मागायलाही ज्या आल्या नाहीत ज्यांनी विकासासाठी आलेला निधी देखील खर्च केला नाही . तो सर्वसामान्यांच्या हक्काचा निधी नाकर्तेपणामुळे वापस गेला याला कारणीभूत असणाऱ्यांना आता आपल्या बहिणीसाठी देखील मते मागण्याचा नैतिक अधिकार नसल्याचा घणाघात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट तथा महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी केला पाटोदा तालुक्यातील गावांमध्ये गावभेट व मतदारांशी संवादा दरम्यान घुमरे पारगाव येथे ते बोलत होते . यावेळी त्यांच्या सोबत माजी आमदार साहेबराव नाना दरेकर, किशोर नाना हंबर्डे, पूजाताई मोरे, ॲड. जाधव, मुकुंद शिंदे, आष्टी विधानसभा प्रमुख रामभाऊ खाडे, परमेश्वर शेळके, आपचे डॉ महेश नाथ, अशोक येडे, उद्धव दरेकर, काँग्रेसचे रविदादा ढोबळे, नगरसेवक भाऊसाहेब गुंड, बालासाहेब जाधव, सचिन वारूळे, ऋषी दरेकर,डॉ चौधरी, सचिन अरुण, विष्णू घोलप, बालासाहेब मिसाळ हे होते. पुढे बोलताना बजरंग बप्पा सोनवणे म्हणाले कि ; ज्यांनी महाविकास आघाडीचे सरकार असताना शेतीमालाला भाव मिळावा म्हणून मोर्चे काढले आंदोलने केली त्यांना मात्र केंद्रात आणि राज्यात सरकार येताच विसर पडला देशात पेट्रोल डिझेल गॅस याचे भाव दिवसेंदिवस वाढत आहेत महागाई प्रचंड वाढलेली आहे खते, बी बियाण्यांचे भाव प्रचंड वाढलेले आहेत. मात्र सोयाबीन, कापूस कांदा यांचे भाव पडलेले असून मातीमोल भावाने त्याची विक्री करावी लागत आहेत. याचाही जाब भाजप उमेदवारांना आणि त्यांच्या समर्थकांना विचारायला हवा. असे परखड मत बजरंग सोनवणे यांनी पाटोदा तालुक्यातील गावांना दिलेल्या भेटी दरम्यान व्यक्त केले .

पाटोदा तालुक्यातील वाघिरा फाटा, वाघीरा आणि वैद्यकिन्ही, वैजाळा पाचेगाव, पाचंग्री, मंझरी, अनपटवाडी, ढाळेवाडी, पाटोदा आणि धनगर जवळका, पारनेर, गवळ वाडी, कुसळंब, सुपा, सावरगाव घाट, मुगगाव याठिकाणी भेटी देवून त्यांच्याशी संवाद साधला.

## गटशेतीतून शेतकरी समृ केज तालुक्यातील शेतकरी सत्यमेव जयते फार्मर कप प्रशिक्षणासाठी रवाना

वादळवार्ता/केज
पानी फाउंडेशन आयोजित सत्यमेव जयते फार्मर कप प्रशिक्षणासाठी केज तालुक्यातील शेतकरी शनिवार रोजी तीन दिवशीय प्रशिक्षणासाठी बीड तालुक्यातील आर्वी येथे रवाना झाले. तालुक्यातील आनंदगाव, पाथरा,पैठण,आडस,चंदन सावरगाव,जवळबन,येवता ,जिवाचीवाडी,माळेवाडी,गप्पेवाडी,तुकूचीवाडी,वरपगाव मोटेगाव, आदी गावातील प्रशिणार्थीचा सामावेश आहे. पर्यावरण मित्र डॉ हनुमंत सौदागर, शरद गिराम आदींनी प्रशिक्षणार्थींचे स्वागत करून हिरवा झेंडा दाखवून शुभेच्छा देऊन रवाना केले. डॉ हनुमंत सौदागर म्हणाले शेती समृद्ध करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. प्रशासन सदैव आपल्या सोबत आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. प्रयोगशील शेतीसाठी महिला पुढाकार घेत आहेत. शेतीमाती समृद्ध करण्यासाठी प्रशिक्षण आवश्यक आहे असे मत व्यक्त केले. प्रशिक्षणार्थी नियोजनासाठी तालुका समन्वयक हरिश्चंद्र पांचाळ यांनी प्रयत्न केले .



## काँग्रेसचे माजी राज्यमंत्री अशोकराव पाटील यांचे केज येथील शिवनेरी निवास स्थानी वंचितचे अशोक हिंगे पाटील यांनी घेतले आशीर्वाद

वादळवार्ता/बीड
बीड लोकसभेचे वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत लोकप्रिय उमेदवार अशोक हिंगे पाटील हे आज केज येथील दौऱ्यावर असताना पक्षाची संवाद बैठक झाल्यानंतर काँग्रेस नेते माजी राज्यमंत्री अशोक पाटील यांची निवासस्थानी भेट घेऊन आशीर्वाद घेतले, यावेळी जवळपास एक तास विविध विषयावर चर्चा झाली.व निवडणूक बाबत अशोक हिंगे यांना सवीस्तर मार्गदर्शन केले .यावेळी त्यांचा सत्कार माजी नगराध्यक्ष पशुपतिनाथ दांगट यांनी उमेदवार अशोक हिंगे यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. त्यावेळी त्यांच्या सोबत जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे, ज्येष्ठ नेते विष्णू जाधव,मिलिंद घाडगे,डॉ. नितीन सोनवणे, ज्ञानेश्वर कवठेकर, बालाजी जगतकर,अजय सरवदे,धम्मा कासारे,चंद्रकांत खरात, तालुकाध्यक्ष बाबासाहेब मस्के,पप्पु गायकवाड,किशोर भोले, केज येथिल शहर तालुका,पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.



# पापक्षालन करण्याची याशिवाय दुसरी वेळ नाही: शरद पवार यांना कपिल पाटील यांचं पत्र; उद्याच निर्णय घेण्याचं आवाहन

**वादळवार्ता/बीड**

वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर अकोल्यातून निवडणूक लढत आहेत. त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीने उमेदवार दिला आहे. विशेष म्हणजे प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडीच्या आठ उमदेवारांना पाठिंबा दिला आहे. त्यात काँग्रेसच्या सात तर शरद पवार गटाच्या एका उमेदवाराचा समावेश आहे. मात्र, असं असतानाही काँग्रेसने आंबेडकरांविरोधात उमेदवार दिल्याने आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. काँग्रेसने आंबेडकरांविरोधात उमेदवार देऊ नये अशी भूमिका अनेक नेत्यांनी व्यक्त केली आहे. समाजवादी गणराज्य पार्टीचे नेते, आमदार कपिल पाटील यांनीही आंबेडकरांना पाठिंबा देण्याचं आवाहन आघाडीला केलं आहे. कपिल पाटील यांनी शरद पवार यांना पत्र लिहून तशी मागणीच केली आहे. पाटील यांचं हे पत्र समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे.कपिल पाटील यांचं पत्र जसंच्या तसं...आदरणीय शरद पवार साहेबमहाराष्ट्र हा फुले – शाहू – आंबेडकर विचारधारेवर उभा आहे. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य चळवळीत सर्वाधिक योगदान महाराष्ट्रानेच दिलं. छत्रपती शिवरायांचा वारसा असलेला महाराष्ट्र दिल्लीच्या तख्तापुढे कधी झुकला नाही. नथुरामी फॅसिस्ट शक्तींच्या विरोधात तुम्ही महाराष्ट्रात महाविकास आघाडी उभी केली. म्हणूनच समाजवादी गणराज्य पार्टी आणि राज्यातील सर्व डाव्या पुरोगामी शक्ती तुमच्या सोबत आहेत.तथापी या आघाडीत नथुरामी फॅसिझमच्या विरोधात सातत्याने सर्वात प्रखर भूमिका घेणारे ॲड. प्रकाश आंबेडकर आणि त्यांची वंचित बहुजन आघाडी यांना सामावून घेण्यात आपल्या सर्वांना अपयश आले. त्यांची सल आपल्याही मनात असेल.प्रकाश आंबेडकर आणि वंचित बहुजन आघाडी यांना महाविकास आघाडीत सामावून घेता आले नाही म्हणून त्यांना भाजपची बी टीम म्हणून हिणवले जात आहे, अपमानित केले जात आहे. हे कमी की काय म्हणून आता महात्मा गांधींचे



पणतू तुषार गांधी यांना महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नातवाच्या आणि वंचित बहुजन आघाडीच्या विरोधी प्रचारात उतरवण्यात आले आहे. हे खरोखरच दुर्मानवी आहे. दुर्दैवी नव्हे दुर्मानवी यासाठी की बाबासाहेबांचा दैवावर विश्वास नव्हता. आणि सश्रद्ध माणसं मानवी चुकांसाठी दैवाला दोष देत नाहीत. ऐतिहासिक जखमांचं ज्यांना भान आहे, त्यांनी त्यावरची खपली का काढावी हे समजत नाही. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे पणतू शाहू छत्रपती महाराज यांना कोल्हापूर लोकसभेत उमेदवारी देण्यासाठी आपण पुढाकार घेतला. ही आशा आणि विश्वास निर्माण करणारी घटना आहे. फुले – शाहू – आंबेडकरांचा महाराष्ट्र फॅसिस्ट जातीयवादी शक्तींना साथ देत नाही. हे आपण दाखवून दिलं आहे. त्याच भूमिकेतून खुद्द प्रकाश आंबेडकर यांनी शाहू छत्रपती यांना पाठिंबा जाहीर केला आहे. बारामतीत सुप्रियाताई सुळे यांच्या विरोधात सुद्धा उमेदवार त्यांनी दिलेला नाही. मात्र डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे खरे वारस प्रकाश आंबेडकर यांच्या विरोधात काँग्रेसचा उमेदवार देऊन आपण मोठी चूक करत आहोत.

# राधानगरी तालुक्यात १३४७ विद्यार्थ्यांची प्रवेश नोंदणी

**वादळवार्ता/कुडूत्री**

गुढीपाडवा या शुभ मुहूर्तावर सहा वर्ष पूर्ण झालेल्या बालकांची शाळेमध्ये प्रवेश निश्चिती करण्यासाठी शासनाने गुढीपाडवा आणि प्रवेश वाढवा.. हा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाला राधानगरी तालुक्यात यावेळी ७०.१४ टक्के प्रतिसाद मिळाला आहे.

राधानगरी तालुका पंचायत समिती समग्र शिक्षा शिक्षण विभागाच्यावतीने या उपक्रमाला अत्यंत चांगला प्रतिसाद मिळाला असून उर्वरित ३० टक्के बालकांची देखील पट नोंदणी येत्या काही दिवसांत करून शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण केले जाणार आहे.

सर्वेक्षणानुसार राधानगरी तालुक्यात १०२२ मुले, ८८७ मुली अशा १९०९ बालकांची नोंद आहे. भारत वर्षाची सुरुवात हिंदू धर्मात गुढीपाडव्यापासून होत असल्याने याच दिवशी हा दिवस शुभ मानला जात असतो. शासनाने शाळेमध्ये प्रवेश वाढवण्याच्या दृष्टीने नोंदणी करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. त्यानुसार




राधानगरी तालुक्यामध्ये ७०१ मुले, ६४६ मुली अशा १३४७ मुलांची शाळा प्रवेशासाठी नोंदणी झाली आहे. ७०.१४ टक्के सरासरी नोंद झाली आहे.

कोते केंद्रात ६५, कौलव केंद्र १६०, ठिकपुर्ली १२०, धामोड ७६, पुंगाव १२४, म्हासुर्ली ६८, तळगाव २९, तारळे खुर्द ६५, तुरंबे १११, सरवडे १२४, सावर्डे ३४, सोळांकुर ८५, गुडाळ ७६, दुर्गमानवाड ४०, दूधगंगानगर ३१, फेजिवडे ४६, दाजीपूर ४, राधानगरी ९० अशी केंद्रातून नोंदणी झाली आहे. उर्वरित बालकांची नोंद शंभर टक्के होण्यासाठी शिक्षण अधिकारी दीपक मेंगाने यांच्या मार्गदर्शनाखाली विस्तार अधिकारी विजय जांगनुरे, ए. जे. कडगावकर, विषयतज्ज अशोक पाटील, प्रदिप पाटील यांच्यासह केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक प्रयत्नशील आहेत.


# खंत आहे पण नाराज नाही, मोदींना पंतप्रधान करण्यासाठी काम करणार – भावना गवळी

शिवसेनेच्या खासदार भावना गवळी यांनी पत्रकार परिषद घेत आपली भूमिका मांडली आहे. यावेळी यवतमाळ व वाशिमचे जिल्हाप्रमुख उपस्थितीत होते. गेल्या पंचवीस वर्षांपासून मी या मतदारसंघाचं प्रतिनिधित्व करत आहे. माझ्या कार्यकाळात अनेक कामे मी केली. अकोला ते पूर्ण रेल मार्ग मी पुढाकार घेऊन ब्रोज गेज तयार केलं. वर्धा नांदेड रेल्वे मार्ग मी पुढाकार घेऊन काम मी केलं. मी नाराज नसल्याचं त्यांनी म्हटले आहे. पण मला या गोष्टीची खंत आहे. मी कुठे कमी पडली हे मला पाहावं लागेल असं देखील त्या म्हणाल्या आहेत. नाराज नाही पण खंत आहे – गवळी

‘माझ्यासाठी पक्ष महत्त्वाचा आहे. पक्षाचे नेते महत्त्वाचे आहेत. माझ्यासाठी शिंदे साहेब महत्त्वाचे आहे. आदरनीय मोदी साहेब महत्त्वाचे आहेत. फडणवीस साहेबांनी मतदारसंघाच्या विकासासाठी पाठबळ दिलं. मुख्यमंत्री शिंदे साहेबांसोबत अनेक मुद्द्यावर पक्षाच्या दृष्टीकोनातून चर्चा झाली आहे. उमेदवाराला निवडून आणण्याची जबाबदारी मला दिली आहे. त्यांच्यासाठी मी प्रचार करेल यात काही दुमत नाही. असं भावना गवळी म्हणाल्या.’

‘मी प्रचाराला जात नसल्याने नाराज असल्याच्या चर्चा आहे. मी नाराज होणारी नाही. मला खंत आहे. मी इतकी वर्ष कामे केली. तरीही तिकीट दिलं नाही. इतर खासदारांना उमेदवारी मिळाली. मला खंत वाटली. त्यामुळे मी बाहेर पडली नाही. मुख्यमंत्री माझ्या पक्षाचे सर्वेसर्वा आहेत. माझ्या वडिलांनी ८५ पासून शिवसेनेचं काम केलं. आमच्या घराणे पक्षासाठी योगदान दिलं आहे. मुख्यमंत्र्यांचे हात मजबूत करण्यासाठी मी मैदानात उतरणार आहे. जयश्री ताईंचे हात मजबूत करणार आहे. मोदींचे हात मजबूत करणार आहे.’

# जेष्ठ समाजसेवक होमलाल चौधरी यांचे निधन


होमलाल चौधरी

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

येथील श्री संत शिरोमणी गुरू रविदास समाज तथा सामाजिक संघटनेचे माजी अध्यक्ष होमलाल बैठुरामजी चौधरी यांचे वृद्धपकाळाने निधन झाले. मृत्यु समयी ते ९१ वर्षाचे होते. यांनी संत शिरोमणी रविदास महाराज यांच्या विचारांचा वारसा जोपासला. समाजात विवाह जुळविण्यात त्यांचा मोठा हातखंडा होता. समजतील अनेक गोरगरिबांचे संसार त्यांनी उभे केले.त्यांच्या निधनामुळे हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पार्थिवावर दि.१४ एप्रिल रविवार रोजी सकाळी ११ वाजता दासोपंत परिसरातील मोची समाजाच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, ५ मुले,४ मुली,सूना नातवंडे असा परिवार आहे.

# सांगलीत बंड होणार?, प्रकाश आंबेडकर कुणाला देणार पाठिंबा?; एका विधानाने मोठी चर्चा

ठाकरे गट आणि काँग्रेस नेते विशाल पाटील यांच्यातील सांगलीचा वाद अजूनही थांबलेला नाही. सांगलीची जागा आपल्याला मिळावी म्हणून अजूनही विशाल पाटील आग्रही आहेत. विशाल पाटील यांचे बंधू प्रतिक पाटील यांनी या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांची भेट घेतली. त्यामुळे सांगलीत मोठी घडामोड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विशाल पाटील बंडखोरी करणार असल्याच्या चर्चांनाही उधाण आलं आहे. त्यातच आता प्रकाश आंबेडकर यांनी सांगलीच्या मुद्द्यावर उघड भाष्य केल्याने महाविकास आघाडीची सांगलीत चांगलीच कोंडी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

प्रकाश आंबेडकर उमरेड येथे सभेसाठी आले होते. यावेळी त्यांनी सांगलीच्या जागेवर भाष्य करून महाविकास आघाडीला टेन्शन दिलं आहे. काँग्रेसमध्ये लढण्याची ताकद नसल्यामुळे त्यांनी ठाकरे गटा समोर नांगी टाकली आहे. सांगलीत उबाठाची उभं राहण्याच ताकद नसून काँग्रेसची ताकद आहे. प्रतीक पाटील भेटून गेले. त्यांना आम्ही पाठिंबा देऊ आणि निवडून आणू अशी ग्वाही देतो, असं विधानच प्रकाश आंबेडकर यांनी केलं आहे. त्यामुळे विशाल पाटील बंडखोरी करणार असल्याच्या चर्चांना बळ मिळत आहे.

चार दिवसांपूर्वी प्रतीक पाटील आले आणि म्हणाले की, काय करायचं? म्हटलं हिंमत असेल, तर लढा. विशाल पाटील लढले तर आम्ही तुम्हाला पाठींबा देतो. आता त्यांच्यात हिंमत आहे की, नाही पाहायचे आहे. ते लढले, तर पाठिंबाही देऊ आणि निवडूनही आणू, असंही त्यांनी सांगितलं.मग वंचितला दोनच जागा का देत होता?काँग्रेसच्या संविधान वाचवण्याच्या दाव्यातील हवाही प्रकाश आंबेडकर यांनी काढून टाकली आहे. काँग्रेस म्हणते, आम्हाला संविधान वाचवण्यासाठी मत द्या. मग वंचितला दोनच जागा का द्यायला निघाल्या होतात?, असा सवाल प्रकाश आंबेडकर यांनी यावेळी उपस्थित केला. मात्र जेव्हा मी आमचा लढा उभारू असं म्हटलं तेव्हा दोन घ्या, दहा घ्या म्हणत होते. खरं म्हणजे यांना दोन पेक्षा जास्त जागा द्यायच्या नव्हता. मॅच फिक्सिंग झालेली दिसते. त्यातून आपली इंक्वायरी बंद करायची असा तर डाव नव्हता ना? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

मॅच फिक्सिंग झालीय

महाविकास आघाडीची अनेक ठिकाणी मॅच फिक्सिंग झाली आहे, असा मी आरोप करतोय. रामटेकमधील काँग्रेस उमेदवाराचं कास्ट सर्टिफिकेट टिकणार नाही हे सर्वांना माहीत होतं. तरीही जबरदस्तीने उमेदवारी दिली. ऐनवेळी उमेदवारी रद्द झाल्यानंतर रश्मी बर्वे यांच्या पतीला उमेदवारी जाहीर केली. नाना पाटोले याना उमेदवारी जाहीर झाली. पण त्यांनी लढण्यास नकार दिला. का? नांदेडमध्ये जो उमेदवार दिला तो आठवड्यातून तीन दिवस डायलिसिसवर असतो. तो प्रचार करेल की तब्येत सांभाळेल. अशी अनेक उदाहरणे मी देऊ शकतो, असं आंबेडकर म्हणाले.

याचा अर्थ काय घ्यायचा?

राहुल गांधी यांनी मॅच फिक्सिंग असा शब्द वापरला. दुर्दैवाने महाविकास आघाडीने तो शब्दप्रत्यक्ष महाराष्ट्रात उतरवला असं मी मानतोय. कल्याण लोकसभा मतदारसंघामध्ये शिवसेनेकडून उमेदवार दिला. पण एकनाथ शिंदेच्या मुलाविरोधात तो उमेदवार लढूच शकत नाही असं कल्याणचेच माणसं म्हणत आहेत. याचा अर्थ काय घ्यायचा?, असा सवाल त्यांनी केला.

म्हणून तुषार गांधींना मिरच्या झोंबल्या

शाम मानव, तुषार गांधी आरोप करत आहेत. मी अनेक नावं घेऊ शकतो की, जे म्हणत आहेत हे उभे कसे राहिले?

# सजग आशा सेविकेमुळे माता व बाळाचे प्राण वाचले; दोघेही सुखरूप स्वाराती रुग्णालयाच्या प्रसूति विभागाची तत्परतता

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

तालुक्यातील येल्डा गावातील गरोदर मातेला अचानक रात्री हृदयविकाराचा झटका आला. ती माता आठ महिन्याची गरोदर होती. रात्री लाईट नाही, आभाळ दाटून आलेले होते.अशा परिस्थितीमध्ये गरोदर मातेला हृदयविकाराचा झटका आला. ही माहिती या गावच्या आशा सेविका शीला गायकवाड यांना समजली.त्यांनी क्षणाचाही वेळ न घालवता लगेच नातेवाईकांना सोबत घेऊन सदरील मातेला स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयाच्या प्रस्तुती विभागात दाखल केली. रुग्णालयात दाखल केल्यानंतर तेथील डॉक्टरांनी सुद्धा क्षणाचाही विलंब न करता तात्काळ शस्त्रक्रिया करून प्रसूति केली. आणि बाळ व मातेला सुखरूप या प्रसंगातून बाहेर काढले. याचाच प्रत्यय शुक्रवारी रात्री गरोदर मातेच्या बाबत आला. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत माता-बाल मृत्यू नियंत्रणात आणण्यासाठी आशा सेविका देशातील गावागावांत सेवा देत आहेत. शासनाच्या आरोग्यासंबंधी योजनांना घरोघर पोहचविण्याचे कार्य त्या पूर्ण जबाबदारीने पार पाडत आहेत. विशेष म्हणजे, माता-बाल मृत्यू नियंत्रणात आणण्यासाठी आशा सेविकांची उत्कृष्ट कामगिरी असल्याचे आपण अनेक वेळा अनुभवले आहे. त्याबद्दल आशा सेविका यांनी बोलताना सांगितले की, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.बाबासाहेब लोमटे व तालुका समन्वयक काझी मॅडम यांनी घेतलेल्या वेळोवेळी प्रशिक्षणाचा या ठिकाणी उपयोग झाला. भविष्यामध्ये असा प्रसंग कोणावर येऊ नये,मात्र जरी कोणावर वेळ आली तर वेळेवर उपचार मिळाला की अनुचित घटना टाळू शकतो. आशा सेविका यांनी दाखवलेल्या तत्परतेबद्दल व डॉक्टरांनी सुद्धा क्षणाचाही विलंब न लावता केलेल्या उपचाराबद्दल सर्व स्थानातून कौतुक होत आहे.



दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रक ग्ु राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )